# प्रेस नोट

जळगाव शहर पोलीस ठाणे
दिनांक 24/02/2025

जळगाव शहरात एमडी अंमली पदार्थ विक्री होत असल्याची ओरड ब-याच दिवसापासून होत होती. पोलीस कसोशीने शोध घेत होते परंतू तस्कर आणि माल लपविण्याच्या ठिकाणाबाबत उपयुक्त माहिती मिळत नव्हती. मा.डॉ महेश्वर रेड्डी पोलीस अधिक्षक, जळगाव यांनी कठोर कारवाई करण्याबाबत आदेश दिले होते.

जळगाव शहर पोलीस ठाण्यातील अर्जशाखेत काम करणारे पोहवा/741 विजय आनंदा निकुंभ आणि पोहवा/1815 प्रफुल्ल दिपक धांडे यांचेकडे शाहूनगर परिसरातील नागरीकांनी केलेल्या एमडी विक्री अर्जाची गांभिर्यानि दखल घेवून सर्फराज जावेद भिस्ती रा. मनपा पडकी शाळेजवळ शाहूनगर, जळगाव याचेबाबत व केलेल्या गोपनिय चौकशीत तो राहत्या घरात एमडी अंमली पदार्थ लपवून ठेवतो अशी खात्रीलायक माहिती मिळाली.

मा.डॉ. महेश्वर रेड्डी, पोलीस अधिक्षक जळगाव, मा. अशोक नखाते, पोलीस उप अधिक्षक जळगाव विभाग, मा. संदीप गावित, उप विभागीय पोलीस अधिकारी, जळगाव विभाग यांना सदरची माहिती देवून, त्यांच्या छाप्याकामी मार्गदर्शनपर सुचना घेण्यात आल्या.

पोलीस निरीक्षक भवारी साहेब, निवडणुक नायब तहसिलदार दिगबंर भिकन जाधव, सरकारी पंच तलाठी दिपक बाबूराव मोरे, आणि श्री. प्रमोद भिकाजी इंगळे, फॉरेन्सिक तज्ञ आदर्श बाळाजी चव्हाण, वजनकाटा धारक जसराज केवलचंद गेलडा, आणि पोलीस पथकातील अधिकारी सपोनि. शितलकुमार नाईक, ग्रेपोउनि. भरत पाटील, सपोउनि. सुनिल पाटील, सपोउनि. रणित, पोहवा/2611 सतिश पाटील, पोहवा/741 विजय आनंदा निकुंभ, पोहवा/1815 प्रफुल्ल धांडे, पोहवा/3389 योगेश पाटील, पोना/2997 चंद्रकांत सोनावणे, पोशी/1051 उध्दव सोनावणे, पोशी/131 प्रणय पवार, पोशी/3245 अमोल ठाकूर यांचे मदतीने छापा टाकला. त्यावेळी इसम नामे सर्फराज जावेद भिस्ती, वय- 23 वर्श, रा. मनपा पडकी शाळेजवळ, शाहूनगर, जळगाव हा आपले घराच्या पत्र्याचे सापटीत 5,34,000/- रुपये किंमतीचा 53 ग्रॅम 40 मिली ग्रॅम एमडी/मॅफेड्रॉन हा अंमली पदार्थ विक्रीसाठी जवळ बाळगलो असता मिळुन आला आहे. त्याचे विरोधात जळगाव शहर पोलीस ठाण्यात गुन्हा रजि.क्रमांक 64/2025, एनडीपीएस कायदा कलम- 8(ब),21(क),22,27 अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. आरोपीने सदरचा अंमली पदार्थ कोठून आणला अगर तो कोणाला विक्री करणार होता, किंवा यापुर्वी त्यांने किती नशाखोरांना विक्री केला आहे अशा इसमांचा पोलीस शोध घेत आहेत.


महाराष्ट्र पोलीस